|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

Grade –B (2.88)
(NAAC RE- ACCREDITED)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

जा.क्र.उमवि/५/५७२/२०१२ दिनांक: ०८/०८/२०१२

## परिपत्रक

प्रति,

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.........

२) उमवि अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/नवीन परिसंस्था सुरु करणेसाठी प्रस्ताव सादर केलेल्या/करणा-या/शासनाने नवीन महाविद्यालय/नवीन परिसंस्था सुरु करणेस मान्यता प्रदान केलेल्या संस्थांचे मा.अध्यक्ष/सचिव.

विषय:- विद्यापीठाच्या संलग्नता विभागातर्फे नियुक्त करण्यांत येणा-या विविध समित्यांच्या प्रवास व दैनिक भत्त्याबाबत........

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, संलग्नता विभागास दरवर्षी नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी, संलग्नीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेत नवीन विषय/अभ्यासक्रम, नवीन विद्याशाखा, नवीन अतिरिक्त तुकडी सुरु करणे तसेच विद्यार्थी संख्या वाढ, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्नीकरण, संलग्नीकरणाचे नुतनीकरण करणे इत्यादिंसाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात. शासनाने दिनांक ३०.१०.२०१० तसेच २५.१०.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी तसेच विस्तार करणेसाठी नव्याने कार्यपध्दती विहीत केलेली आहे. विद्यापीठातर्फे त्यानुसार कार्यवाही करण्यांत येत असून यात टप्पेनिहाय तज्ज्ञ समित्यांची नियुक्ती करणे, अपिल दाखल झाल्यास त्याअनुषंगाने पुन:श्च समिती नियुक्त करणे असे टप्पे वाढलेले असून विद्यापीठास त्याकरिता नियुक्त समितीतील सदस्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अदा करावा लागतो. याशिवाय संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्नीकरण इत्यादिंसंदर्भात वेळोवेळी नियुक्त करण्यांत येणा-या स्थानिक चौकशी समितीमधील सदस्यांना तसेच एक सदस्सीय समितीस विद्यापीठामार्फत प्रवास व दैनिक भत्ता अदा करावा लागतो. त्याचप्रमाणे एखाद्या महाविद्यालयासंदर्भात चौकशी/तपासणीकामी नियुक्त केल्या जाणाऱ्या समितीसदेखील विद्यापीठामार्फत प्रवास व दैनिक भत्ता अदा करण्यांत येतो.

उपरोक्त बाबींसंदर्भात मा.कुलगुरु महोदयांशी सखोल चर्चा झाल्यानंतर विद्यापीठाच्या संलग्नता विभागातर्फे नियुक्त होणा-या **(तज्ज्ञ समिती, स्थानिक चौकशी समिती, एक सदस्सीय समिती, महाविद्यालयांसंदर्भात चौकशी करणेसाठी नियुक्त होणारी चौकशी/तपासणी समिती किंवा तद्नुषंगाने नियुक्त होणारी समिती इत्यादि)** समितींमधील सदस्यांना यापुढे विद्यापीठाकडून प्रवास व दैनिक भत्ता अदा न करता, तो संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी अदा करावा, असे आदेश मा.कुलगुरु महोदयांनी दिलेले आहे.

त्याअनुषंगाने दिनांक ०१.०८.२०१२ पासून संलग्नता विभागामार्फत नियुक्त करण्यांत आलेल्या/येणा-या विविध समित्यांमधील सदस्यांना, ज्या महाविद्यालयांच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या तपासणीकामी/चौकशी करणेकामी समिती नियुक्त करण्यांत आलेली आहे/येईल, अशा संबंधित महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी विद्यापीठाच्या प्रवास व दैनिक भत्ता नियमावलीनुसार समित्यांमधील सदस्यांना प्रवास व दैनिक भत्ता अदा करावा ही विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

**Sd/xxx**

(प्रा.डॉ.दि.गो.हुंडीवाले)
संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहितीसाठी:-

१) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग.

२) विद्यापीठाच्या प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख.